28 JAN 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आदी.

सकाळ

## शिवाजी विद्यापीठ

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. आर. के. कामत, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. ए. एम. गुरव,डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. नमिता खोत, डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

पुण्यनगरी

## विद्यापीठात ध्वजवंदन

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्या शाखेचे अधिष्ठाता एस. एस. महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक एम. एस. देशमुख, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक आर. व्ही. गुरव, क्रीडा संचालकपी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालक नमिता खोत उपस्थित होते.

पुढारी

# आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत तर्कतीर्थांचे योगदान अमूल्य : डॉ. मोरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बुद्धी हे राजकारण व परमार्थ यांचे साधन होऊ शकते. बौद्धिक सामर्थ्याने राजकारणात यशस्वी होता येईल, अशी धारणा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची होती. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत तर्कतीर्थांचे योगदान अमूल्य आहे, असे मत महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केले.

आजादी का अमृतमहोत्सव अंतर्गत शिवाजी विद्यापीठ यशवंतराव चव्हाण अध्यासनाच्यावतीने आयोजित 'तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी - विचार व कार्य' ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, तर्कतीर्थ हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नव्या पिढीला ओळख करून देणे गरजेचे आहे. प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी केले. अमोल मिणचेकर यांनी आभार मानले.

28 JAN 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये भरणार दोन मार्चपासून

## पहिले सत्र संपले : पदवी प्रथम वर्ष परीक्षा मंगळवारपासून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोना, ओमायक्रॉनचा प्रादुर्भाव कमी असलेल्या ठिकाणी १ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यास राज्य शासनाने परवानगी दिली आहे. मात्र, शिवाजी विद्यापीठाच्या यंदाच्या शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र २४ जानेवारीला संपले असून, महाविद्यालयांना सुटी सुरू आहे. दुसरे सत्र २ मार्चला सुरू होणार आहे. त्यामुळे या दिवसापासून कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील महाविद्यालये भरणार आहेत.

विद्यापीठातील अधिविभाग आणि संलग्न महाविद्यालयांच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग ७ जानेवारीपासून ऑनलाईन सुरू झाले. तीन दिवसांपूर्वी इ. पहिली ते बारावीपर्यंतच्या शाळा ऑफलाईन सुरू झाल्या. त्याच दिवशी १ फेब्रुवारीपासून महाविद्यालये ऑफलाईन सुरू करण्यास परवानगी दिली. विद्यापीठाचे पहिले सत्र १ ऑक्टोबरपासून सुरू होऊन २४ जानेवारीला संपले. महाविद्यालयांना १ मार्चपर्यंत सुटी आहे. त्यामुळे शासनाने ऑफलाईन वर्गास परवानगी दिली असली, तरी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वर्ग २ मार्चपासून भरणार आहेत. महाविद्यालयांतील वर्ग भरणार नसले, तरी १ फेब्रुवारीपासून पदवी प्रथम वर्षाच्या हिवाळी सत्रातील ऑनलाईन परीक्षा सुरू होणार आहेत. त्या १५ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहेत.

### १८६०० विद्यार्थ्यांना लस

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील १३३ अनुदानित महाविद्यालयांत एकूण ९८,५८० विद्यार्थी प्रवेशित झाले. पैकी १८ वर्षांवरील १८,६०० विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण झाले. त्यात १५,३०५ जणांनी पहिला, तर ३,२९५ विद्यार्थ्यांनी दुसरा डोस घेतला आहे, अशी माहिती उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. हेमंत कठरे यांनी दिली.



पदवी प्रथम वर्षाच्या परीक्षा मंगळवारपासून ऑनलाईन स्वरूपात सुरु होणार आहेत. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये २ मार्चपासून ऑफलाईन भरणार आहेत.

**- डॉ. व्ही. एम. पाटील**, सचिव,
शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 JAN 2022 लोकसत्ता

# राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी

## कार्यगटाची स्थापना, पदवीसाठी आता चार वर्षे

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय गुरुवारी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या वेळी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात स्थापन केलेल्या डॉ. रघुनाथ माशेलकर समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला असून पदवी शिक्षणासाठी आता चार वर्षे तसेच ५० वर्षे पूर्ण झालेल्या शिक्षण संस्थांना विद्यापीठाचा दर्जा देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने डॉ. माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन केला होता. या कार्यगटाने ३० जून रोजी सादर केलेला अहवाल मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला. या अहवालात पुनर्रचना, अभ्यासक्रम, अध्यापकाचे शिक्षण, सुशासन, डिजिटल शिक्षण, संशोधन व कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षण, सर्वसमावेशक आणि समानता, भाषा, कला आणि वित्त आदी विषयांच्या अनुषगांने नऊ शिफारशी केल्या आहेत. त्यामध्ये पदवीचा तीन वर्षांचा कालावधी चार वर्षे करणे, ५० वर्षे पूर्ण झालेल्या संस्थेस विद्यापीठाचा दर्जा द्यावा, राज्य विश्वासार्ह संशोधन व नवोपक्रम परिषदेची स्थापना करावी, १० वी नंतर तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांसाठी प्रवेश धोरण ठरवावे अशा शिफारशी समितीने केल्या आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत या अहलावर चर्चा झाल्यावर या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या कार्यगटात उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण, शालेय शिक्षण, क्रीडा, वैद्यकीय शिक्षण व औषधे द्रव्ये, कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्यव्यवसाय, कौशल्य विकास व उद्योजकता या खात्यांचे मंत्री यांचा समावेश असेल.

माशेलकर समितीने केलेल्या शिफारशींच्या अंमलबजावणीसाठी विविध समित्या स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली. बहुविद्याशाखीय उच्च शैक्षणिक संस्थांचा आराखडा तयार करण्याबाबत व राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या अधिकार क्षेत्राचा पुनर्विचार करण्याबाबत तसेच अध्यापन व अध्ययनाची उत्कृष्टता केंद्रे तयार करण्याबाबत राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या पाच कुलगुरूंची एक समिती स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.

पुढारी

# विद्यापीठात आजपासून लोकशाही पंधरवडा उपक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत शुक्रवार (दि. २८ जानेवारी)पासून लोकशाही पंधरवड्यास सुरुवात होणार आहे. यानिमित्त विविध ऑनलाईन स्पर्धांचे आयोजन केले आहे. २८ जानेवारी रोजी निबंध स्पर्धा (राज्यशास्त्र अधिविभाग), दि. २९ रोजी माईम स्पर्धा (राष्ट्रीय सेवा योजना), दि. ३१ रोजी लघुपट स्पर्धा (माय कम्युनिकेशन), दि. २ फेब्रुवारी रोजी चित्रकला (संगीत व नाट्यशास्त्र), दि. ४ रोजी वक्तृत्व स्पर्धा (समाजशास्त्र अधिविभाग), दि. ७ रोजी घोषवाक्य स्पर्धा (मराठी अधिविभाग), दि. १० रोजी गायन (राष्ट्रीय येवा योजना) स्पर्धा होतील. स्पर्धांमध्ये सहभागी होण्याचे आवाहन समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांनी केले आहे.

2 8 JAN 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# घोषवाक्ये बनली कृतिशील पावले...

## पर्यावरणशास्त्र विभागात जमा केला जातो प्लास्टिक कचरा

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या एन्व्हार्मेंटल सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी विभागाची 'सेव्ह एन्व्हार्मेंट सेव्ह वर्ल्ड'चा नारा देत कृतिशील पावले पडत आहेत. प्लास्टिकच्या बाटल्या, चॉकलेटवरील प्लास्टिक कागद, खाद्यपदार्थांच्या पिशव्या एकत्रित करून त्या कॅम्पसमध्ये पसरणार नाहीत, याची दक्षता घेतली जात आहे. तीन वर्षांपासून ही अनोखी मोहीम सुरू असून, ती विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांत बिंबली आहे. विभागाच्या इमारतीतील पायऱ्यांवर पर्यावरण



रक्षणाची लावलेली घोषवाक्ये सार्थकी ठरली आहेत.

विद्यापीठाच्या बी. टेक. विभागाच्या इमारतीत अकरा अभ्यासक्रमात दीड हजारांहून अधिक विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांत

> **महाविद्यालयीन आयुष्यात विद्यार्थ्यांना पर्यावरणाचे महत्त्व कळणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पायऱ्यांवर घोषवाक्य लिहिण्याचा उपक्रम केला. त्याला प्रतिसाद मिळत आहे.**
> **- डॉ. श्रीकांत भोसले, विभागप्रमुख**

पर्यावरणविषयक जाणीव बळकट व्हावी, असा विचार प्राध्यापकांत आला. त्यासाठी एन्व्हार्मेंटल सायन्स अँड टेक्नॉलॉजी विभागाने पुढाकार घेतला. विभाग प्रमुख डॉ. श्रीकांत भोसले यांनी इमारतीतील जिन्याच्या पायऱ्यांवर पर्यावरणविषयक घोषवाक्ये लिहिण्याची संकल्पना मांडली. त्यानुसार पहिल्या मजल्यावर जाणाऱ्या पायऱ्यांवर ती लिहिली.

विद्यार्थी खाद्यपदार्थांच्या पिशव्या, चॉकलेटचे कागद अथवा प्लास्टिक बाटल्या कॅम्पसच्या परिसरात अथवा वर्गात टाकणार नाहीत, यासाठी त्यांना आवाहन केले. त्याला प्रतिसादही मिळत गेला. प्राध्यापकांनीही वर्गात अथवा कॅम्पच्या परिसरात एखादा प्लास्टिक कागद पडला तरी तो प्लास्टिक बाटल्यांमध्ये जमा करण्यास सुरुवात केली. प्रा. डॉ. अजित कोळेकर प्लास्टिक बाटल्यांत कचरा जमा करून तो कचरा पेटीत टाकतात.



पहिल्या मजल्यावर लिहिलेली घोषवाक्ये.